लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
LOK AARAMBH
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले
बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | शनिवार १० मे २०२५ | अंक १४८ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

SUN Touriism INTERNATIONALL PVT. LTD. Since 2007
All TOURS घर से घर तक दिल से दिल तक 1st TIME in TRAVEL INDUSTRY
www.suntourismpune.in
सन टुरिझम
प्रस्तुत करते
देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय ग्रुप टूर्स !
आमच्या विशेष टूर पॅकेजेस
काश्मीर, वैष्णोदेवी, नैनीताल, शिमला, अयोध्या
ग्रँड युरोप, ऑस्ट्रेलिया, जपान, दुबई, श्रीलंका
व्हिएतनाम, सिंगापूर, थायलंड, बाली
आता आपल्या स्वप्नांच्या सहलींची नोंदणी करा...
-: अधिक माहितीसाठी संपर्क :-
99222 22272 / 7602727555

# पाकिस्तानच्या कुरघोड्या सुरुच, पंजाबच्या निवासी भागावर ड्रोनने हल्ला, अनेकजण जखमी



सध्या भारत पाकिस्तान सीमेवर युद्धसदृश्य परिस्थिती पाहायला मिळत आहे.

पहलगाम हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानाला ऑपरेशन सिंदूर अंतर्गत जोरदार प्रत्युत्तर दिले. भारतीय लष्कराने पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमध्ये दहशतवादी तळ उद्धस्त केले. यानंतर पाकिस्तानकडून भारतावर सूड उगवण्यासाठी ड्रोन आणि क्षेपणास्त्रांचा वापर करत हल्ला करण्याचा प्रयत्न सुरु आहे. त्यातच आता पंजाबमधील फिरोजपूरमध्ये पाकिस्तानी ड्रोनने निवासी भागावर हल्ला केला आहे. यात एक कुटुंब जखमी झाल्याची माहिती मिळत आहे. सध्या या जखमी कुटुंबातील सदस्यांना रुग्णालयात दाखल करण्यात येत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पाकिस्तानकडून सातत्याने सीमाभागात हल्ले केले जात आहेत. नुकतंच पंजाबच्या फिरोजपूरमधील खाई या गावात पाकिस्तानने ड्रोनद्वारे हल्ला करण्याचा प्रयत्न केला. हा ड्रोन भारताकडून पाडण्यात आला. त्यावेळी ड्रोनला आग लागली. त्यानंतर हा जळत असलेला ड्रोन नागरी भागात पडला. त्यामुळे एका घराला आग लागली आहे. या आगीत एकाच कुटुंबातील तीन जण जखमी झाले आहेत. सध्या त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. त्यांच्या उपचारासाठी त्यांना फिरोजपूरमधील एका जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. लोकांना घरातच राहण्याचे आवाहन पंजाबमधील गुरदासपूर जिल्ह्यातील डेरा बाबा नानक भागात मोठा स्फोट झाल्याची माहिती समोर आली आहे. याच भागात करतारपूर कॉरिडॉर देखील आहे. पाकिस्तानकडून जम्मू विभागातील राजौरी येथे आणखी एका ड्रोन हल्ल्याचा प्रयत्न करण्यात आला. स्थानिक लोकांच्या म्हणण्यानुसार, करतारपूर कॉरिडॉरच्या आसपास अनेक ड्रोन दिसले आहेत. भारताच्या हवाई सुरक्षा प्रणालीने हे सर्व ड्रोन हवेतच पाडले. या हल्ल्यात कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी, परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. यानंतर पोलीस आणि प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेऊन लोकांना घरातच राहण्याचे आवाहन केले आहे. करतारपूर साहिब कॉरिडॉर बुधवारपासून बंद ‘ऑपरेशन सिंदूर’मुळे भारत आणि पाकिस्तानच्या सीमेजवळ असलेला करतारपूर साहिब कॉरिडॉर बुधवारपासून बंद करण्यात आला आहे. त्यामुळे या ठिकाणी लोकांची वर्दळ कमी झाली आहे. सध्या भारताच्या सीमेवर कडक सुरक्षा व्यवस्था करण्यात आली आहे. भारत सरकारने करतारपूर साहिब दर्शनाची वेबसाइट देखील बंद केली आहे, ज्यामुळे या ठिकाणी गर्दी कमी झाली आहे.

# हत्यार नसलेलं ड्रोन पाठवण्यामागे पाकिस्तानचं खतरनाक षडयंत्र; भारताने वेळीच उचललं मोठं पाऊल

आज पुन्हा एकदा परराष्ट्र मंत्रालयाची पत्रकार परिषद पार पडली, या पत्रकार परिषदेत महत्त्वाची माहिती देण्यात आली आहे. पाकिस्तानने गुरुवारी रात्री आठ वाजता भारतावर हल्ल्याचा प्रयत्न केला होता. पाकिस्तानने भारतातील सैन्य तळांना लक्ष्य करण्यासाठी काही क्षेपणास्त्रे आणि ड्रोन डागले, या हल्ल्यामध्ये पाकिस्तानने तुर्कीच्या ड्रोनचा वापर केल्याचं समोर आलं आहे, असं परराष्ट्र मंत्रालयानं म्हटलं आहे. आठ मे रोजी भारताच्या सीमेलगतच्या शहरांवर पाकिस्तानकडून हल्ल्याचा प्रयत्न करण्यात आला, या हल्ल्यासाठी पाकिस्तानने तुर्कीच्या ड्रोनची मदत घेतली आहे, हल्ल्यादरम्यान पाकिस्तानचे जे ड्रोन भारतानं पाडले, त्या ड्रोनची प्राथमिक फॉरेन्सिक तपासणी करण्यात आली आहे, त्यातून हे तुर्कीचे ड्रोन असल्याचं समोर आलं आहे, या ड्रोनचा उपयोग हा एखाद्या गोष्टीची टेहळणी करण्यासाठी तसेच जवळून अचूक हल्ला करण्यासाठी करण्यात येतो, अशी माहिती देखील परराष्ट्र मंत्रालयाकडून देण्यात आली आहे. विंग कमांडर व्योमिका सिंह यांनी



यासंदर्भात माहिती देताना सांगितलं की, 8 आणि 9 मे दरम्यान पाकिस्तानने भारताच्या पश्चिम सीमेवरून अनेकदा भारतीय हवाई हद्दीचं उल्लंघन केलं, भारतीय सैन्य तळांना लक्ष्य बनवण्याचा त्यांचा उद्देश होता. पाकिस्तानकडून एलओसीवर देखील गोळीबार सुरूच आहे. आतापर्यंत भारताच्या 36 ठिकाणांवर पाकिस्तानकडून हल्ल्याचा प्रयत्न झाला आहे, मात्र हा हल्ला भारतानं परतून लावला आहे. पाकिस्तानकडून घुसखोरीचा प्रयत्न होत आहे. पाकिस्तानने शस्त्र नसलेले ड्रोन देखील पाठवले होते, या मागे त्यांचा उद्देश असा होता की, भारतीय सैन्य तळांची टेहळणी करणे, सोबतच इतर काही गुप्त माहिती मिळवण्याच्या उद्देशानं देखील त्यांनी हा ड्रोन हल्ला केला होता

## अवघ्या काही मिनिटांचा उशीर, अन्यथा मदरशातच एक गट्टा ठार झाले असते लष्करचे 3000 अतिरेकी...

अतिरेकी हाफिज सईज याचा गड मानला जाणाऱ्या मुदिरके येथे ७ मे रोजी झालेल्या भारताच्या एअर स्ट्राईक संदर्भात मोठी धक्कादायक बाब उघडकीस आली आहे. अल-जजीराच्या बातमीनुसार या मुरिदकेच्या मदरशात जर काही मिनिटांच्या आधी भारताचा एअर स्ट्राईक झाला असता तर एकाच वेळी लष्करचे ३००० अतिरेकी एकाच जागीच ठार झाले असते. एक मिनिटांच्या विलंबनाने बहुतांशी अतिरेकी वाचल्याचे अल-जजीराने म्हटले आहे. पाकिस्तानात मुरिदके प्रांत लष्कर -ए-तैयबाचा गड म्हटला जातो. येथेच लष्करच्या अतिरेक्यानां प्रशिक्षण दिले जाते.येथून प्रशिक्षित झालेल्या अतिरेकी आंतक वाद पसरविण्यासाठी कश्मीरच्या दिसेने दिसतो. संपूर्ण प्रकरण काय आहे ते पाहूयात.... अल-जजीरा च्या मते मुरिदके परिसरात हाफीज सईचा एक मदरसा आहे. एक आरोग्य केंद्र आणि मस्जिदची निर्मिती केली आहे. याशिवाय याच मुरिदकेत एका कॉलनीची उभारणी केली आहे. येथे पाकिस्तान सरकारचे सरकारी कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबियांना येथे ठेवले जाते. सुमारे ३०० कुटुंबं या इलाक्यात रहात आहेत. मुरिदके येथे एका मदरसा असून त्यात ३००० हुन अधिक मुलांना शिकवले जाते. या मुलांना सकाळी फिजिकल ट्रेनिंग दिली जाते. यानंतर जिहादचा अर्थ सांगितले जात आहे. मदरशात राहणारे एक मौलाना यांनी अल-जजीरा सांगितले की येथे तीन दशकांहून अधिक काळ मुलांचे शिक्षण दिले जाते. मौलानाने हाफीजच्या मदरशात अतिरेक्यांना प्रशिक्षण दिले जात असल्याचा आरोप खोडून काढला आहे.

# पाकिस्तानचे तीन तुकडे होणार?, भारताच्या जबरदस्त प्रहारनंतर डिफेन्स एक्सपर्ट्स काय म्हणतात?

भारताच्या ऑपरेशन सिंदूरच्या दणक्यानंतर पाकिस्तानची चांगलीच नाचक्की झाली आहे. पाकिस्तानकडून करण्यात आलेले सर्व हल्ले भारतीय लष्कराने परतवून लावले आहेत. भारताने पाकिस्तानचे ड्रोन अन् क्षेपणास्त्रे निकामी केली आहेत. भारताचे ऑपरेशन सिंदूर आणि पाकिस्तानमधील परिस्थिती यासंदर्भात संरक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांनी माहिती दिली. निवृत्त लेफ्टनंट जनरल दत्तात्रय शेकटकर, निवृत्त ब्रिगेडियर हेमंत महाजन यांनी पाकिस्तानमधील परिस्थितीबद्दल शी बोलताना माहिती दिली. निवृत्त लेफ्टनंट जनरल दत्तात्रय शेकटकर यांनी सांगितले की, पाकिस्तानने आगळीक केल्यामुळे आपल्याला पुन्हा पाकिस्तानवर हल्ले करावे लागले आहे. आपण केलेल्या हल्ल्यात पाकिस्तानी लष्कराची हवाई यंत्रणा निकामी झाली आहे. पाकिस्तानची परिस्थिती पाहिल्यावर पुढील पाच दहा वर्षांत बलुचिस्तान हा पाकिस्तान मधून वेगळा होईल. तसेच सिंधू प्रांत देखील पाकिस्तानमधून वेगळा होईल. फक्त पंजाबच पाकिस्तान राहील, असा अंदाज निवृत्त लेफ्टनंट जनरल दत्तात्रय शेकटकर यांनी व्यक्त केला. पाकिस्तान सातत्याने भारताला पोकळ धमक्या देत आहेत. भारताने केलेल्या एअर स्ट्राईकमुळे मृत्यू झालेल्या दहशतवादी पाकिस्तानी झेंड्यात लपटलेले दिसले. तसेच त्यांच्या दफनविधीला लष्करचे अधिकारी देखील उपस्थित होते. यामुळे पाकिस्तानचा खरा चेहरा समोर आला आहे, असेही निवृत्त लेफ्टनंट जनरल दत्तात्रय शेकटकर





यांनी म्हटले. पाकिस्तानचे पंतप्रधान कठपुतली ब्रिगेडियर हेमंत महाजन यांनी सांगितले की, भारत आणि पाकिस्तान आता युद्धाकडे वाटचाल करत आहे. पाकिस्तानच्या पंतप्रधानांच्या हातात आता काही राहिले नाही. सर्व काही पाकिस्तानी लष्कराने हातात घेतले आहे. ड्रोननंतर आता क्षेपणास्त्र आणि फायटर जेटने देखील पाकिस्तानवर हल्ला होऊ शकतो. दहशतवाद्यांच्या दफनविधीला लष्कराचे अधिकारी उपस्थित राहतात. त्यांच्या मृतदेहाला पाकिस्तानचा ध्वज लपटलेला असतो. हे सर्व पुरावे आपण आंतरराष्ट्रीय पातळीवर ठेवू शकतो. त्यामुळे पाकिस्तानवर जगाने आर्थिक निर्बंध लादण्याची गरज आहे. तसेच पाकिस्तानला दहशतवादी देश म्हणून घोषित करण्याची आवश्यकता आहे, असे ब्रिगेडियर हेमंत महाजन यांनी म्हटले. विंग कमांडर शर्मा म्हणाले की, पाकिस्तानला गाझा बनवण्याची पूर्ण तयारी झाली आहे. आपण जो हल्ला केला तो पिन पॉइंट होता. यामुळे संयुक्त राष्ट्रसंघानुसार तो एक्ट ऑफ वॉर नाही. ऑपरेशन सिंदूर आम्ही दहशतवादी तळ नष्ट केल्यावर संपवले होते. परंतु त्यानंतर पाकिस्तानने हल्ला केला. त्याचे उत्तर देणे गरजेचे आहे.

# पाकिस्तानी खासदाराने संसदेत शाहबाज शरीफ यांना झाप- झाप झापले

भारताच्या ऑपरेशन सिंदूरचा धसका पाकिस्तानने चांगलाच घेतला आहे. त्याचे पडसाद पाकिस्तानच्या संसदेत उमटत आहे. ”अल्लाह हमारी हिफाजत करे” म्हणत पाकिस्तानच्या संसदेमध्ये पीएमएलएनचे (पाकिस्तान मुस्लिम लीग) खासदार ताहीर इक्बाल चक्क रडू लागले होते. तो व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला. त्यानंतर आता पाकिस्तानी खासदार शाहिद अहमद यांनी संसदेत पंतप्रधान शाहबाज शरीफ यांना झाप-झाप झापले आहे.

खासदार शाहिद अहमद यांनी संसदेत पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांना जोरदार फटकार लावले आहेत. ते म्हणाले, आमचे पंतप्रधान शाहबाज शरीफ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नाव घेण्यास घाबरतात. ते घाबरट आहे. मला टिपू सुलतान यांचे एक वाक्य आठवते. एका लष्करात सिंह असले आणि त्याच्यासोबत कोल्हे असतील तरी ते सिंहासारखे लढतात. परंतु सिंहाचा सरदार कोल्हा असेल तर ते सिंहासारखे लढू शकत नाही. ते युद्धात पराभूत होतात. तुमचे नेतृत्व घाबरणारा असेल तर काहीच करु शकत नाही,





असे खासदार शाहिद अहमद यांनी म्हटले.शाहिद अहमद हे पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान यांच्या पीटीआय पक्षाचे सदस्य आहेत. ते म्हणाले की, शाहबाज शरीफ यांनी त्यांच्या भाषणात नरेंद्र मोदी यांचे नावही घेतले नाही. त्याचे व्यावसायिक संबंध आहेत. ते त्याचे नावही घेऊ शकत नाहीत. तसेच नवाझ शरीफ यांनी भारताबद्दल एकही विधान केले नाही, असा घरचा आहेर खासदार शाहिद अहमद यांनी दिला.शाहिद अहमद याच्यापूर्वी पाकिस्तानी खासदार ताहीर इक्बाल यांचा व्हिडिओ व्हायरल झाला होता. ते संसदेत रडले होते. ते म्हणाले होते, अल्लाह आमचे रक्षण करो... आपल्या देशाचे रक्षण करो. आपण गुन्हेगार आहोत. आपण कमी पडत आहोत. मजबूर आहोत. जगभरात जिथे बघावे तिथे मुस्लिमांवर अन्याय होत आहे. त्यामुळे आता आपण सर्वांनी एकत्रित येऊन शत्रूंना धडा शिकवला पाहिजे, असे इक्बाल यांनी म्हटले होते.

## रात्री बॉर्डरवर खूप काही मोठं घडलय, पाकिस्तानची फतेह मिसाइल हवेतच नष्ट





भारताने बॅलेस्टिक मिसाइलद्वारे तीन एअरबेसना टार्गेट केलं असा पाकिस्तानचा दावा आहे. रात्री उशिरा भारताने पाकिस्तानात एकापाठोपाठ एक 6 बॅलेस्टिक मिसाईल्स डागले. यात रावळपिंडीमधील नूर खान एअरबेस, शोरकोटमध्ये रफीकी एअर फोर्स तळ आणि मुरीद एअरफोर्स बेसला टार्गेट करण्यात आलं, असं पाकिस्तानकडून सांगण्यात येतय. भारताकडून अजून याची पुष्टी करण्यात आलेली नाही. पाकिस्तानाकडून करण्यात आलेले हल्ले आणि दाव्यांसंदर्भात भारतीय सैन्याकडून 10 वाजता प्रेस ब्रीफिंग होणार आहे. आधी पहाटे 5.45 वाजता पत्रकार परिषद होणार होती. पण आता 10 वाजता ही पत्रकार परिषद होईल असं सांगण्यात आलं आहे ल्याने पाकिस्तानमध्ये हाहा:कार उडाला आहे. हाय अलर्ट जारी भारताच्या सुरक्षेसाठी आम्ही तयार आहोत. आमच्यावर हल्ला केला तर आम्ही गप्प बसणार नाही. आम्ही जशास तसे उत्तर देणार असा इशारा भारतीय सैन्याने दिला आहे. तसेच देशातील सर्व विमानतळांना सतर्कतेचे आदेश देण्यात आले आहेत. भारताच्या तिन्ही सैन्यांना अलर्ट राहण्याचे आदेशही देण्यात आले आहेत. दरम्यान, भारताने आज दिवसभरात पाकिस्तानातील तीन एअर डिफेन्स सिस्टिम बंद केली होती. लाहोर, कराची आणि रावळपिंडीतील ही सिस्टिम बंद करण्यात भारताला यश आलं आहे. त्यामुळे पाकिस्तान हादरून गेला आहे. पाकिस्तानने संपूर्ण ब्लॅकआऊट केला असला तरी भारताकडून पाकिस्तानवर हल्ला सुरूच आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
शनिवार १० मे २०२५
https://lokaarambh.com



## संपादकीय

### फक्त भारतीय घटनेचे शिल्पकार नव्हे, एक कुशल महान अर्थत देखील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर.

भारत रत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर हे नाव ऐकताच डोळ्यासमोर भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार एवढा सम्मान युक्त उदगार मुखातून बाहेर पडतो त्यांचे कार्य घटनेपूरतेच मर्यादीत आहे. असे कित्येक लोकांचा गैरसमज ही असेल. तर काही सुशीक्षीत लोकांना हे कार्य अमर्यादीत आहे हे पूर्ण पणे न्यात ही असेल. भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर स्त्रीयांच्या जीवनाचे शिल्पकार, शोषित पीडितांचे तारणहार, बैरिस्टर कामगारांचे हीतचिंतक, कायदे पंडित, अश्या कित्येक आदरयुक्त नामानी सर्व जाणतात. परंतु बाबासाहेब महान अर्थतन्त्र होते. हे ठरावीक लोकांस माहिति असेल. त्यांनी ज्या महत्वाच्या पदव्या मिळवल्या होत्या.त्यामध्ये ‘अर्थशास्त्र’ हा विषय विविध अभ्यास क्रमात निवडला होता. भरताची महत्वाची बँक रिझर्व बँकची निर्मिती डॉ बाबासाहेबांच्या प्रॉब्लेम ऑफ द रुपीज या ग्रंथाच्या माध्यमातून झाली. भारत सरकाने 8 नोव्हेंबर 2016 रोजी 1000/500 चालनातू बाद केल्या. त्या मागचा हेतू खूप महत्वाचा होता. या कृती मधून समांतर अर्थव्यवस्थेला स्वल्पविराम बसेल. तसेच दहशतवादाला बेकायदेशीर व बनावट पैसावर कुऱ्हाड बसेल? अनेक माध्यम वहिन्यानंवर ही बातमी वाऱ्यासारखी झळकत राहिली. विविध अर्थत चे विचार नव्याने चर्चेत आले. त्यात सर्वोच्च कोणत्या अर्थत चे नाव असेल? तर ते नाव होते भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर. बाबासाहेबांच्या मते साठेबाजी, काळापैसा व चलनवाढ यांसारख्या समस्यावर उपाय म्हणून भारतीय चलन दर दहा वर्षानी बदलण्यात यावे. परंतु एक अर्थत या नात्याने त्यांनी असेही बजावले होते ‘ व्यवस्थेला वळसा घालू बघणाऱ्यांना अटकावं करणे. व सामान्य माणसाला दिलासा देणे’. डॉ आंबडेकरांनी मुक्त अर्थव्यवस्था, जागतीकीकरण, उदारीकरण व खाजगीकरण यांच्या स्वीकार करण्याच्या सूचना अगदी 1923 मध्ये केल्या होत्या. त्यामुळे अनेकजण त्यांना काळाच्या शतकभर अगोदर अवतरलेला अर्थतन्य असे म्हणतात. त्याबरोबरच समस्त भारतीय स्त्रियांचे मुक्तीदाता, शेतकरी कामगारांचे नेते, कुशल घटनाकार, अमेरिकेतील कोलंबीया विद्यापीठामध्ये 250 वर्षातील सर्वोत्तम हुशार विद्यार्थी, जगातील विद्वानाच्या यादीमध्ये चौथ्या स्थानी विराजमान, 32 शैक्षणिक पदव्या संपादन करणारा जगातील पहिले व्यक्ती. D. Sc म्हणजेच ‘डॉ ऑफ सायन्स ‘हा 8 वर्षाचा अभ्यासक्र अवघ्या 2 वर्षात पूर्ण करून पदवी संपादन करणारे पहिले भारतीय. फक्त शोषित, पीडित, दलितांचेच नव्हे तर संपूर्ण भारतीय नागरीकांचे भाग्यविधाते!भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबडेकर आहेत हे भारताने विसरता कामा नये. आणि त्यांचे भारतीय अर्थव्यवस्थेचे महत्वाचे योगदान त्यांचे राष्ट्रीय विचार शासना ने कृतीत आणणे आवश्यक आहे. फक्त भारतीय घटणेचे शिल्पकार नव्हे, अन्य विविध राष्ट्र साठी केलेल्या महत्वाच्या मोलाच्या कामाची तेवढीच चर्चा व्हावी. आणि तशी कृती ही घडावी.

**लेखक:**
**गौतम सांगेलकर (सिंधुदुर्ग )**

# तृतीयपंथीय समूहाच्या समस्या

भारतीय संविधानानुसार आपल्या देशात तीन पंथांना मौलिक स्थान दिले जाते. त्यातील स्त्री, पुरुष आणि तृतीयपंथी ज्याला समाज्यामध्ये हिजडा,किन्नर (हिंदी) व इंग्लिशमध्ये थर्ड जेंडर असे संबोधले जाते ज्यांचे लिंग त्यांना जन्माच्या वेळी नियुक्त केलेल्या व्यक्तीशी जुळत नाही त्यांना ट्रान्सजेंडर किंवा थर्ड जेंडर असे म्हटले जाते .यामध्ये ट्रान्स पुरुष व ट्रान्स महिला यांचा समावेश असतो. समाज्यामध्ये स्त्री, पुरुष आणि तृतीयपंथी यामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये भेदभाव केला जातो. ज्याप्रमाणे स्त्री व पुरुष आपल्या मनाने व्यवसाय ,शिक्षण, आरोग्य यांसारखे कार्य स्वतःच्या मनाने करू शकतात. तर ट्रान्सजेडर या व्यक्तींना यातले कोणत्याही प्रकारचे काम करण्याची सुविधा मिळत नाही किंवा त्या सुविधांपासून ते अजूनही वंचित असलेले आपल्याला दिसून येतात. असं म्हणतात की, सजीव सृष्टी निर्माण करताना स्त्री, पुरुष यांना स्वतःच्या कर्तृत्वाचा , सौंदर्याचा व त्यांच्या श्रेष्ठत्वाचा अहंकार दूर करण्यासाठी सृष्टीवर अशा एका व्यक्तीचा जन्म झाला जी स्त्री, पुरुष दोघांपेक्षा वेगळी असेल.समाजाच्या हिताची असेल,सर्वगुण संपन्न असेल,नावलौकिक कमावणारी असेल ,तर दोघांमधील श्रेष्ठ गुण त्या एका व्यक्तीत असतील .ज्याने समाज्याला एक संदेश मिळेल तर स्त्री , पुरुष यामध्ये मतभेद राहणार नाहीत.परंतु आपल्या समाज्यामध्ये तृतीय पंथीयांच्या तिरस्कार केला जातो त्यांना हिन वागणूक दिली जाते म्हणजेच जन्माने फक्त स्त्री पुरुषांनाच आपल्या समाज्यात स्थान दिलं गेलं.परंतु ज्या स्त्री पुरुष्यांच्या पोटी जन्म घेणाऱ्या तृतीय पंथी शूद्र होऊ शकतो ही समाज्याची केविलवाणी स्थिती आहे . आज अनेक हक्कांसाठी आपल्याला लढताना दिसतात ,माणसाच्या जातीला कलंक लावणारे कृत्य आज वास्तविक परिस्थीतीत पाहायला मिळत आहे हे मानवी स्वभावाच अत्यंत लाजिरवाणे दुर्दैव दिसून येते.अश्या या सुसंस्कृत समाज्यामध्ये तृतीय पंथी व्यक्तीला कोणत्याही प्रकारचे मौलिक स्थान दिले जात नाही .त्यांना छक्का ,वायल्या, हिजडा अशा अनेक नावाने रस्त्यावर बसले असताना चिडवले जाते . सामन्यामध्ये तृतीय पंथीयांची केली जाणारी हेटाळणी : जन्माला येणं हे कोणाच्या हातात नसतं तर अशा व्यक्तीला जन्म देणारे हे नक्कीच सामान्य स्त्री व पुरुष असतात. परंतु आपल्या पोटच्या पोराला रस्त्यावर सोडताना रात्रीच्या अंधारांमध्ये यांना जरा सुद्धा किव येत नाही. घरातून हाकलून दिलेल्या मुलांना आई-वडिलांचे प्रेम मिळत नाही. अशावेळी समाजात सुद्धा त्यांना मान सन्मान दिलं जात नाही ,त्यांना समाज स्वीकारत नाही ,त्यांची हे टाळणे केली जाते. वेळोवेळी त्यांचा अपमान केला जातो, त्यांना लाजिरवाणे अपशब्द बोलवून त्यांना दोष दिला जातो. अन्न वस्त्र आणि निवारा या मानवाच्या मूलभूत गरजा आहेत. परंतु या मूलभूत गरजांपासून अजूनही ट्रान्सजेडर व्यक्ती दुर्लक्षित घटक म्हणून समाजामध्ये वावरताना आपल्याला दिसत आहे .रस्त्यावर टाळ्यांचा आवाज झाला की भन्नाट लागते, ट्रेनमध्ये पुरुषांसारखे दिसणारे परंतु पुरुष नसणारे स्त्रियांसाठी वेशभूषा करणारे , सिग्नल ला पान खाऊन गाड्या थांबल्या पोटासाठी पैसे मागायला धावत सुटणारे ,असे व्यक्ती दिसली तिला हिजडा म्हणून सहज सगळेच चिडवतात. एकटे दिसले की त्यांना त्रास देतात त्यांची थिल्लर उडवतात. रात्रीच्या अंधारात त्यांचे अपहरण करतात आणि सिग्नलला आणून सोडतात .त्यांच्या बाबतीत अश्या अनेक प्रकार घडतात. घरातून वेगळेपणा जाणवल्यामुळे समाज्यात आपला मान सन्मान होऊ नये, म्हणून पोटच्या पोरांना घराबाहेर हाकलून देताना त्यांचं वय बघत जात नाही, तर परके त्यांचे लचके तोडताना कोणाची भीती बाळगणारआहेत. आश्रमामध्ये असणारी म्हातारी माणसं बाहेर गेली असता पुन्हा परत यायला उशीर झाला म्हणून अनेक कर्मचारी रस्त्यावर धावताना आपल्याला दिसतात .पण यांच्यासाठी हरवले म्हणून कोणी शोधायला येत नाही. घरात लग्न, शुभकार्य, बारसं ,हळदी असल्यावर अनेकजण गाठीभेटी घ्यायला येतात ,त्यांना आमंत्रण देतात, कारण त्यांनी दिलेल्या आशीर्वाद खरे होतात, म्हणून त्यांना एक दिवस तो मान दिला जातो . त्यानंतर त्यांना पायाखाली तुडवले जाते .पण वर्षानंवर्ष तिरस्कार करणाऱ्या व्यक्तींचा एक दिवस मानसन्मान केल्याने त्यांनी दिलेले आशीर्वाद खरे ठरणार आहेत का ?त्यांना झालेल्या वेदना या कमी होणार आहेत का? तृतीय पंथी समाज्यातील एक दुर्लक्षित घटक : तृतीय पंथांना समाज्यामध्ये अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. शिक्षण, आरोग्य, रोजगार ,सामाजिक भेदभाव, लैंगिक शोषण ,आणि वैद्यकीय सुविधा अशा अनेक सुविधा त्यांच्यापर्यंत पोहचत नसल्याने त्यांना अनेक वेळा हिन वागणूक दिली जाते . ज्या व्यक्तींचं अस्तित्व घरातील मंडळीं नाकारतात अशावेळी समाज त्यांना स्वीकारत नाही, रोजगार देत नाही , रहिवासी असल्याचा पुरावा नसल्याने त्यांना शासनाकडून दुर्लक्षित घटक म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. समाज्याचा एक सजीव आणि निरोगी भाग म्हणून त्यांच्याकडे कोणीही पाहत नाही, त्यांना कोणी आपले म्हणत नाही. रेल्वे स्टेशन व बसस्टॉप मध्ये त्यांचा वावर दिसला की, लोक दूर पळतात कारण समोर येऊन उभे राहिले तर ते पैसे मागतील व ते आपल्याल द्यावे लागतील ,त्यांना चिडवून कधी कधी त्यांना हाकलावून लावले जाते ,त्यामुळे त्यांना बऱ्याच वेळा पायी प्रवास करावा लागतो. मुलांचे पहिला समाज आपले आई-वडील असतात. जे घरांमध्ये चांगले वाईट शिकवून इज्जत देतात . दुसरे आपले भाऊबहीण असतात, नातेवाईक असतात मित्रमंडळी असतात. जी जगाशी ओळख करून देतात, इतर गोष्टींचा ज्ञान देतात. आणि तिसरे म्हणजे या व्यतिरिक्त लोक ज्यांना ते प्रथम घराबाहेर पडल्यावर भेटतात. त्यावेळी त्यांना जाण्वते,की आपण या सर्वांपेक्षा काहीतरी वेगळे आहोत ,आपल्यात काहीतरी वेगळेपणा आहे त्यामुळे आपल्यापासून अनेक लोक दूर पळत आहेत. आपला तिरस्कार करत आहेत ,आपली हेटाळणे करत आहेत , आपल्याला वाईट अपशब्द बोलत आहेत ,ही जी बाळमनाची मनस्थिती आहे ती लगेच भरून निघत ,याला जबाबदार जर कोणी असेल तर ते स्वतःला स्त्री आणि पुरुष्याच्या चौकोणात स्वतःला परिपूर्ण समजणारे आपण आहोत. बऱ्याच वेळा ट्रान्स जेडरला आपल्यातील वेगळेपणा उशिरा समजतो किंवा जाणवायला लागतो. लगेच समजत नाही तर काही वर्षांनी काही काळ लोटल्यानंतर समजू लागते आणि त्यानंतर त्यांना आपल्यातील वेगळेपण जाणवतो ,त्यामध्ये पुरुष ट्रान्सजेंडर आणि महिला ट्रांसजेंडर असे दोन प्रकारचे व्यक्ती असल्याचे दिसून येते. अशावेळी दवाखान्यात सुद्धा त्यांना तीच परिस्थिती दिसून येत . उपचारा दरम्यान तृतीय पंथी व्यक्तीला मेल वॉर्ड मध्ये ठेवायचं की फिमेल वॉर्ड मध्ये ठेवायचं हे कोणी अजून नेमून दिलं नाही .त्यामुळे त्यांच्यासाठी स्वतंत्र अशी जागा अजूनही दवाखान्यामध्ये उपलब्ध नाही. त्यांना कोणती गोळी द्यायची हे सुद्धा डॉक्टर माहित नसतं . बऱ्याच वेळा त्यांना आपले आजारपण अंगावर काढून परीस्थिलाला सामोरे जावे लागते. वेळेवर उपचार न होऊ शकल्याने त्यांना मोठमोठ्या रोगांना सामोरे जावे लागते. आज तृतीय पंथियांमध्ये HIV च प्रमाण अधिक असल्याचे जाणवते.सेक्स वर्करच्या व्यवसायाने जेवणाची सोय होते पण जीव घेण्या आजारांना त्यांना तोंड द्यावं लागतं. आपल्या भारतीय संविधानामध्ये आय द इंडियन सिटीजन असा स्पष्ट उल्लेख केलेला आहे. यामध्ये स्वतंत्र सन्मान कोणा एका व्यक्तीला श्रेष्ठत्व दिलं गेलं नाही .त्यामुळे या देशात स्त्री, पुरुष इतकचं तृतीय पंथीयाना समान अधिकार असला पाहिजे . माणसामाणसातील भेदभाव मानणारा समाज आज कितीही उंच शिखरावर जाऊन पोहचला तरी माणुसकी जपणारी आणि मान देणारी पिढी नष्ट झालेली कुठे तरी झालेली दिसत आहे. कुटुंबापासून मिळालेला पोरकेपणा : आपण जन्म दिलेलं बाळ सामान्य नसून इतर मुलांपेक्षा वेगळे आहे ,हे जेव्हा त्यांना जन्माला आल्यानंतर काही वर्षांनी समजते . मुलगा असून त्याला मुलीनसारख नटायला,सजायला,आवडते जी लक्षण सामान्य नसून वेगळी आहेत. अश्या वेळी समाज्यामध्ये आपला मान ,सन्मान कमी होऊ नये,लोकांनी नाव ठेवू नये, या भीती पोटी कित्येक आई वडील आपल्या मुलांना रात्रीच्या अंधारात रस्त्यावर एकट्याने सोडतात. कोणत्याही विचार न करता आपलं मातृत्व नाकारतात .त्यांचं वय पाहिलं जात नाही .बाळावर संस्कार करणाऱ्या वयात त्याला एकटेपणा दिला जातो. आई वडिलांचं प्रेम मिळत नसून भिक मागून पोट भराव लागत.स्वतःच हक्काचं घर असून रस्त्यावर फुटपाथवर झोपाव लागतं,एका कपड्यावर कित्येक रात्र जागून काढाव्या लागतात याला जबाबदार कोण असावं? जन्माला कोणाच्या पोटी येणं हे कोणाच्याच हातात नसतं.पण मातृत्व नाकरण हे अत्यंत लाजिरवाणी गोष्ट आहे .ज्यांच्या बालवयात डोक्यावरचं छत्र हिरावून घेतले जाते.त्यांच्या कडून आशीर्वादाची अपेक्षा मागणारे स्वतःला प्रामाणिक म्हणून घेणारे लोक जिवंत पणी त्यांना प्रत्येक वेळी मरणाची शिक्षा देत आहेत. आपल्या कुटुंबातील सदस्यांना आपल्यामुळे त्यांना कोणताही त्रास होऊ नये म्हणून घरचा पत्ता माहीत असूनही ते कधी कोणत्या सणाला हक्काने तिथे जात नाहीत . कोणाला त्रास होईल अस वागत नाही.काही लोक आपल्या मुलांना त्यांच्यापासून दूर ठेवतात पण खरच आज पाहिलं तर तृतीय पंथी कोणत्याही राज्यात, जिल्ह्यात व गावात ते आपल्यापासून सुरक्षित आहेत . तृतीय पंथीयांच्या हक्कांची पूर्तता व सुरक्षितता: समाजातील वंचित असणारा घटक ज्याचे अस्तित्व सर्वांनी सर्वानी नाकरले गेले ,तिथे त्यांनी हार मानली नाही. ते लढले आपल्या हक्कांसाठी, आपल्या समाज व्यवस्थेसाठी, आणि त्यांना यश आलं सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पहिल्यांदा 2011 मध्ये देशातील थर्ड जेंडर ची भारतीय जनगणनेत नोंद करण्यात आली .त्यानुसार ४९,००० हजार इतकी होती त्यानंतर निसर्गाच्या लिंगभेदानुसार स्त्री पुरुष यांसारखेच ट्रान्सजेंडर देखील समाजाचा विभाग आहेत त्यांना सुद्धा समान अधिकार दिला गेला पाहिजे, ज्याने त्यांच्या मूलभूत गरजा भागवल्या जातील, स्वतःचा उदरनिर्वाह ते स्वतः करू शकतील . आपल आयुष्य घडवण हे प्रत्येकाच्या हातात असते पण समाज्याने दुर्लक्षित केलेला घटक आज आपल्या अस्तित्वासाठी लढताना दिसत आहे. आणि म्हणूनच आपल्याला ते वेळोवेळी विविध रूपात मेहनत करताना दिसत आहेत .त्यांना सुद्धा भूक लागते, त्यांना सुद्धा गरजा आहेत, त्यांना सुद्धा आधाराची गरज आहे, आणि चांगले अन्न मिळवण्याची पूर्ण अधिकार आहे. अलीकडे थर्ड जेंडर साठी संस्था सुरू झालेल्या आपल्याला दिसतात त्यामुळे रात्रभर जागून काढणाऱ्यांची संख्या कमी झाली. आज पाहिलं तर प्रशासकीय सेवेत देखील तृतीयपंथानी आपले नामांकन मिळवले आहे . स्वयंम् रोजगाराच्या संधीमुळे त्या स्वयं विकसित होताना दिसत आहेत.आणि यातूनच त्यांची लढाई सुरू राहिली त्यानंतर पहिल्यांदा २०१४ मध्ये तृतीय पंथाना भारतीय म्हणून मतदानाचा अधिकार दिला गेला . सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार २०२४ मध्ये दुपटीने अधिक तृतीयपंथांची मतदान संख्येत वाढ झालेली दिसून आली आणि त्यानुसार तिसरी वर्गवारी मध्ये तृतीय पंथांची करण्यात नोंदणी ट्रांसजेंडर वोटरस् म्हणून प्रथम भारतीय जनगणनेत नोंद करण्यात आली .स्वतःच्या नशिबाला दोष देऊन अनेक जन आपलं आयुष्य संपवण्याचा प्रयत्न करतात.पण स्वतःच्या मनाविरुद्ध घडणाऱ्या प्रत्येक घटनेला सामोरे जाताना तृतीय पंथी आज आपल्याला दिसत आहेत .ज्या समाज्याचे अस्तित्व नाकारले जाते त्याच समाजातील लोकांनी स्वतःला सिद्ध करण्यासाठी पुढाकार घेतलेला दिसत आहे .ओळख व न्याय मिळवून देण्यासाठी काही संस्था कार्यरत असून हक्कांची पूर्तता करताना दिसत आहेत. एक भारताचा सक्षम नागरिक म्हणून प्रत्येकाने तृतीय पंथीयांनसाठी मदतीचा हात दिला गेला पाहिजे.जमेल त्या स्वरूपात त्यांचा आदर केला पाहिजे. समस्या ही कधीही ही न संपणारी मानवाची उत्पत्ती आहे .त्यामुळे त्याचं होईल त्या स्वरूपात निराकरण सरकारने केले पाहिजे त्याने तृतीय पंथीयांच्या पुढील पिढीला आपले हक्क मिळतील .त्यांचा प्रवास सुरळीत चालू राहील.प्रशासनातील काही जागा पटकावून सर्वोच्च स्थानी नामांकन असेल .त्यामुळे एक जुटीने राहून समाज्यात त्यांचा आदर केला पाहिजे. ज्याने त्यांच्या समस्या नक्कीच कमी होतील.

**लेखिका**
**अश्विनी भाऊ खोलांबे.**

# आई वडिलांच्या संघर्षाची जीवन कथा

आई-वडिलांबद्दल जेवढ बोलावं तेवढं कमी पडेल. पण मी या लेखात थोडफार बोलून व्यक्त होते. आई-वडील मुलांना जन्म देतात. लाहाण्याचे मोठे करतात. चांगले संस्कार देतात. त्यांना खूप शिकवतात. प्रत्येक आई-वडिलांना वाटत असते की, आपल्यावर जी परिस्थिती आली, ती आपल्या मुलांवर येता कामा नये. म्हणून ते एवढी धडपड करतात.आई वडील खूप संघर्ष करून आपल्या लेकरांना शिकवतात. प्रत्येक आई-वडिलांच्या डोळ्यात एकच स्वप्न असते की, आपला मुलगा किंवा मुलगी खूप मोठं काहीतरी व्हावं. आणि हे सहाजिक आहे, मुलांना देखील हे कळलं पाहिजे की आपले आई-वडील आपल्यासाठी किती धडपड करतात. याची जाणीव मुलांना कळली पाहिजे. मुलांना स्वतःसाठी नाही तर आई-वडिलांसाठी मोठं झालं पाहिजे. मुलांना आपल्या आई-वडिलांच्या संघर्षाचं चीज केलं पाहिजे. मुलं मोठी झाली आणि स्वतःच्या पायावर उभी झाली की आई वडील त्यांचे लग्न लावून देतात. मग मुलं आपल्या प्रपंचाला लागले की नंतर तेच मुलं आपल्या आई-वडिलांशी संपत्ती बद्दल भांडू लागतात. हे चुकीचं आहे ना. असं नाही केलं पाहिजे. आपण हा विचार करत नाही की, आपण त्यांच्याशी असं वागलो तर त्यांचं मन किती दुखेल. मी प्रत्येक तरुण पिढीला सांगू इच्छिते की, संपत्तीसाठी भांडण्या पेक्षा आई-वडिलांच्या सेवेकरिता भांडा. मग जग तुमच कौतुक करेल. कारण जग गोल आहे. तुम्ही आज तुमच्या आई-वडिलांसोबत जशी वागता, तसेच तुमचे देखील मुलं तुमच्याशी वागतील. म्हणून भांडायचं आहे तर त्यांच्या सेवेकरिता भांडा. ही संपत्ती वगैरे काहीच नसते. आई वडीलच आपली सगळ्यात मोठी संपत्ती आहे. तुम्हाला आई-वडिलांविषयी प्रेम बघायचं असेल तर ,तुम्ही त्या अनाथ- आश्रमा मध्ये जाऊन बघा. ती मुले आई-वडिलांच्या प्रेमासाठी व्याकुळ झालेली असतात. कारण त्यांच्याजवळ आई-वडीलच नसतात. ते बिचारे अनाथ असतात. अस म्हणतात की, कुठलीही गोष्ट किंवा व्यक्ती आपल्या जवळ असली की त्याची किंमत आपल्याला नसते, मग ती दुरावली की तेव्हा आपल्याला त्याची जाणीव कळते. काही काही मुलं आई वडिलांना असे देखील म्हणतात की, तुम्ही आमच्यासाठी काय केलंय? अरे मी तुम्हाला सांगते की आई वडील जन्म दिले हीच तर मोठी गोष्ट आहे. तेच तर तुम्ही पुण्य समजा. कारण ते होते म्हणून आज तुम्ही इथपर्यंत आले याची जाणीव प्रत्येकाला असली पाहिजे. मुलांना आई-वडिलांचा आदर ,प्रेम ,सन्मान ,सगळं केलं पाहिजे. आई-वडील आपल्यासाठी नाही तर आपण आई-वडिलांसाठी काहीतरी केलं पाहिजे.

नुकतीच एक हृदयस्पर्शी घटना साताऱ्या जिल्ह्यात घडली. वयोवृद्ध झालेल्या आई-वडिलांची सेवा करायला “मोठा भाऊ लहान भावाला संधीच देत नाही. लहान भावाने मोठ्या भावाबद्दल न्यायालयात दावा ठोकला”. म्हणजे यातून शिकण्यासाठी खूप काही आहे. अशी मुलं प्रत्येक आई-वडिलांच्या पोटी जन्माला आले पाहिजे. मग कुठल्याच आई वडिलांना वृद्धाश्रमाची गरज पडणार नाही. अरे म्हातारपणात वृद्धाश्रमाची गरज नसते तर, तुमच्या प्रेमाची गरज असते. कारण म्हातारपण हे बालपण असते ना. तुम्ही आज तुमच्या आई-वडिलांच्या मातारपणात त्यांची सेवा केले तर, तुम्ही म्हातारे झाल्याच्या नंतर तुमचे मुलं देखील तुमची सेवा करतील.मग हे जग कुठल्या कुठे जाईल आपल्याला कळणार सुद्धा नाही. मुलांनी असं काम केलं पाहिजे की आई-वडील म्हणाले पाहिजे की ,आम्ही यांची मायबाप नाही तर ,हा माझा लेकरू आहे. मी सांगते तुम्हाला आम्ही देखील तीन बहिणीच आमच्या आई वडिलांना आहोत .पण आम्ही हे असं कधीच वागणार नाही. कारण आमची सगळ्यात मोठी संपत्ती म्हणजेच आमचे आई वडील आहेत आमच्यासाठी. आम्हाला हे काही नको धन, दौलत ,पैसा, संपत्ती फक्त त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद बघायचं आहे. कारण आमचे धन, दौलत , संपत्तीच आमचे आई वडील आहेत...

**कु.सिदूधी भास्कर बनसोड**
**कुरखेडा, गडचिरोली**
**7378470441**



दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
शनिवार १० मे २०२५
https://lokaarambh.com



## सौ.प्रतिमा अरुण काळे यांना तेजस्विनी महाराष्ट्राची २०२५ हा पुरस्कार जाहीर.




"माणुसकी मल्टिपर्पज फाउंडेशन महाराष्ट्र राज्य" आयोजित राज्य स्तरीय पुरस्कार सोहळ्यात सन्मान स्त्री शक्तीचा,गौरव कर्तुत्वाचा.... अंतर्गत सौ.प्रतिमा अरुण काळे यांचे साहित्यिक,पर्यावरण,शैक्षणिक,सामाजिक,महिला सक्षमीकरण यातील अतुलनीय कार्यासाठी या वर्षीचा तेजस्विनी महाराष्ट्राची २०२५ हा पुरस्कार जाहीर झाला. आयोजक,नियोजक,निवड समितीतील सर्व मान्यवरांचे सौ.प्रतिमा काळे यांनी आभार मानले.हा भव्य दिव्य सोहळा २५ मे २०२५ रोजी,मलकापूर जिह्ला:- बुलडाणा येथे होणार आहे. यासाठी त्यांचे सर्व स्तरावरून कौतुक होत आहे.

## सामाजिक कार्यकर्ते गणेश हिरवे यांची निवड



सुभाष मुळेमुंबई प्रतिनिधी जोगेश्वरी पूर्व येथील सामाजिक कार्यकर्ते गणेश हिरवे यांची कार्यकारिणी सभासद म्हणून श्री समर्थ विद्यालय जोगेश्वरी पूर्व या शाळेत २०२५ ते २०२८ करीता अध्यक्ष डॉ एम डी वळंजू यांनी निवड केली आहे.हिरवे यांचे समाजासाठी खूप छान योगदान असून वर्षातून बऱ्याच वेळा ते समाजकार्यात स्वतःला झोकून देऊन काम करीत असतात.एक हरहुन्नारी, विनोदी आणि समाजातील तळागाळातील लोकांसाठी काय चांगले करता येईल यासाठी नेहमीच ते धडपडत असतात असे डॉ वळंजू सांगतात.तर हिरवे यांची मूर्ती लहान पण किर्ती महान असून त्यांचे कार्य नेहमीच इतरांना प्रेरणा देत असल्याचे अनेक मान्यवरांनी वेळोवेळी आपल्या भाषणातून अधोरेखित केलं आहे.त्यांच्या संपर्कात आल्याने अनेक चांगल्या गोष्टी शिकायला मिळतात, ते कायमच दीपगृहाचे काम करीत असतात.पत्रकारिता, शिक्षण आणि समाजसेवा या तीन घटकांवर काम करण्यासाठी त्यांचा पुढाकार असतो.हिरवे यांची निवड झाल्याने अनेकांनी त्यांचे अभिनंदन केलं असून त्यांना भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## साहित्यिक रज्जाक शेख यांचा काव्यगंध साहित्य मंचावर गौरव



श्रीरामपूर (प्रतिनिधी) काव्यगंध साहित्य मंचाचे राज्यस्तरीय दुसरे कवी संमेलन शांती कमल हॉटेल शिर्डी येथे नुकतेच संपन्न झाले. या कवीसंमेलनात विशेष उपस्थिती म्हणून मराठी साहित्यिक गझलकार रज्जाक शेख यांचा शाल ,पुष्पगुच्छ, सन्मानपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन साहित्यिक योगदानाबद्दल विशेष गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजक ॅड.अक्षशिला शिंदे,डॉ.नवनाथ शिंदे,उद्योजक बाबर,अर्जुन गायकवाड,प्रकाशक प्रशांत गोरे,सुमनताई मुठे, संमेलनाचे अध्यक्ष साहित्यीक भारत सातपुते,व्याख्याते अमोल चीने आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.श्रीरामपूरचे प्रसिध्द कवी,गझलकार तथा जीवन जीवनगौरव शैक्षणिक मासिकाचे सहसंपादक आणि काव्यदरबार ईदिवाळी अंकाचे संपादक रज्जाक शेख यांनी साहित्य क्षेत्रात अल्पावधीतच मोठे यश संपादन केलेले आहे.अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावर सलग चौथ्यांदा निवड झाली आणि राज्यभरात शंभराहून अधिक संमेलनातून करत असलेल्या प्रबोधनपर कवितांच्या सादरीकरणाबद्दल शेख यांचा विशेष सन्मान करण्यात आला.राज्यातील विविध वृत्तपत्रातून "खेळू करू शिकू" या शासकीय पुस्तकाचे समीक्षण करून लेखाद्वारे सर्व राज्यभर प्रसिद्धी दिली. तसेच जिह्ला परिषदेच्या जिह्ला शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांच्यांतर्फे शैक्षणिक कविसंमेलनात दोनदा काव्यसादरीकरणाची संधी मिळाली. राज्यभरातील विविध वृत्तपत्रांमध्ये आपल्या बालकविता व शेतीमातीच्या जवळपास अठराशे वेळा कविता प्रकाशित झाल्या आहेत. नाशिक येथील कवी नारायण सुर्वे कट्ट्यावरील संमेलन,जीवनगौरव मासिकाचे औरंगाबाद येथील संमेलन, अण्णाभाऊ साठे संमेलन स्वराज्य संस्थेचे संमेलन,एक मैफिल कवितांचे संमेलन अश्या डझनभर संमेलनाचे ते माजी संमेलनाध्यक्ष आहेत. या सन्मानाबद्दल त्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

## भारतीय सैनिकांच्या शौर्य आणि बलिदानच्या सन्मानासाठी रक्तदान शिबीराचे आयोजन देशाभिमान असणाऱ्यांनी सहभागी व्हावे – उल्हास गिराम

बीड : (प्रतिनिधी) भारताच्या 'ऑपरेशन सिंदूर ' च्या माध्यमातून पाकिस्तानी दहशतवाद्या विरोधात केलेल्या धाडसी कारवाई नंतर पाकिस्तानी लष्कराने हल्ल्याची सुरुवात केली आहे. यामध्ये कर्तव्यावर असणाने काही भारतीय सैनिक शाहिद झाले आहेत. भारती सैनिकांच्या शौर्य आणि बलिदानच्या सन्मानासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले असल्याचे जिह्लाप्रमुख



उह्लास गिराम यांनी सांगितले आहे.

ऑपरेशन सिंदूर मुळे पाकिस्तान ची जगभरात नाचक्की झाली आहे. पाकिस्तान ने बुधवार पासून भारता विरोधात कारवाया चालु केल्या आहेत. पाकिस्तान चा प्रत्येक नापाकप्रयत्न भारतीय लष्कर परतवून लावत आहे. यात काही निष्पाप भारतीय नागरिकांचा व लष्करी सैनकांचा बळी गेला आहे. भारती जावनांचा उत्साह वाढवण्यासाठी, या शाहिद जवानाप्रती सहानभूती असणाऱ्या, देशाप्रती स्वाभिमान असणाऱ्यांनी या रकदान शिबिरात सहभागी होण्याचे आवाहन जिह्लाप्रमुख उल्लास गिराम यांनी केले आहे.

सदरील रक्तदान 10 मे शनिवार रोजी सकाळी 11 वाजता घेण्यास सुरुवात होईल. बीड बस्थानकमागे असणारे शिवसेनेचे जिह्ला संपर्क कार्यालय या ठिकाणी हे शिबीर आयोजित केले आहे. बीड शहरातील सुजान नागरिकांनी, तरुण युवक - युवतीनी, देशाभिमान असणाऱ्यांनी, शिवसैनिकांनी या शिबिरात सहभागी होऊन रक्तदान करून भारतीय लष्करी सैनिकांना प्रोत्साहन द्यावायचे आहे.

## आयआयटीएन्स आणि स्टार्टअप फंडींग – एक यशोगाथा

 संजय पाटील, essenet , २०२५

पूर्वी जेव्हा विद्यार्थ्यांचे स्वप्न 'आयआयटी' (IIT) मध्ये प्रवेश मिळवण्याचे असायचे, ते केवळ एका कारणासाठी १००% नोकरीची हमी. पदवी पूर्ण होताच फॉर्च्युन ५०० कंपन्या किंवा जागतिक स्तरावरील दिग्गज कंपन्यांच्या कॅम्पस इंटरव्ह्यूद्वारे थेट भरती व्हायची. आयआयटीतून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांचे भविष्य उज्ज्वल असेल, यात शंका नसायची. कारण, आयआयटीमध्ये प्रवेश घेणारा विद्यार्थी हा हजारो विद्यार्थ्यांमधून निवडलेला असतो, ज्याच्याकडे असते ती असाधारण बुद्धिमत्ता आणि तर्कशक्ती ज्यामुळेच आंतरराष्ट्रीय स्तरावरही त्यांना मोठी मागणी असते. आता आयआयटी म्हणजे नोकरी + स्टार्टअप फंडिंग ची १००% हमी. आज मात्र या पारंपरिक कल्पनेला एक नवा कोन प्राप्त झाला आहे. आता आयआयटी म्हणजे केवळ नोकरीची गॅरंटी नाही, तर स्टार्टअप फंडिंगचीही हमी. सरकार स्वतः आयआयटीयन्सना प्रोत्साहन देते की, "फंडिंग घ्या आणि स्वतःची टेक कंपनी सुरू करा." हे चित्र खूप वेगळं आहे. आज भारतात १,१३,३६० टेक स्टार्टअप्स अधिकृतपणे नोंदणीकृत आहेत. यापैकी सरकारने दिलेले ४९% स्टार्टअप फंड्स फक्त आयआयटी कॉलेजेससाठी राखीव ठेवले आहेत. यामागे सरकारचा विश्वास आहे की आयआयटीयन्स हे जन्मजात हुशार असतात. ते कोणताही प्रोजेक्ट संपूर्ण समर्पणाने करतात. त्यामुळे त्यांचे स्टार्टअप्स यशस्वी होण्याची शक्यता जास्त असते. आणि जर तो प्रोजेक्ट यशस्वी झाला नाही तरी त्यांच्याकडे टॉप एमएनसीमध्ये नोकरीची १००% हमी असते. भारतातील टेक स्टार्ट अप यशस्वी करणारे आय आय टीन्स चे प्रसिद्ध उदाहरणे. दीपेन्द्र गोयल हा आयआयटी दिल्लीचा माजी विद्यार्थी. त्याने Zomato सुरू करून भारतात फूड डिलिव्हरी क्रांती घडवली. तसेच भाविश अग्रवाल ओला कॅब्सचा संस्थापक, त्याचेही शिक्षण आयआयटीमधून झालेले. अजुन उदाहरण द्यायचे झाले तर सचिन आणि बिन्नी बन्सल Flipkart चे सह-संस्थापक, तेही आयआयटी दिल्लीचे माजी विद्यार्थी. असे अनेक आय आय टी एन्स ने टेक स्टार्ट अप यशस्वी केलेले आहेत. हे सगळे दाखले सिद्ध करतात की आयआयटीयन्सना टेक स्टार्टअपसाठी केवळ कौशल्य नाही तर त्यांच्या कडे एक मजबूत नेटवर्क असते, कारण त्यांच्या मित्रपरिवारात अनेकजण विविध मोठ्या कंपन्यांमध्ये उच्च पदांवर असतात. त्यामुळे बिझनेस डेव्हलपमेंटसाठी त्यांना विशेष अडचणी येत नाहीत. मात्र, आता परिस्थिती बदलत चालली आहे. गुंतवणूकदार स्टार्टअपमध्ये पैसा गुंतवण्यापूर्वी संबंधित संस्थापकांची पार्श्वभूमी, मार्केट स्कोप आणि नफा तपासतात. तसेच आता आयआयटीयन्सची पूर्वी सारखी 'क्रेझ' राहिलेली नाही, कारण इतर परदेशी कॉलेजेस मधून मास्टर्स केलेले विद्यार्थीही आयआयटीयन्सना टक्कर देऊ लागले आहेत. टेक इंडस्ट्री आता केवळ विषयाच्या ज्ञानाला नाही तर तर्कशक्ती आणि समस्यांचे समाधान करण्याच्या क्षमतेला (Logical Mindset) अधिक महत्त्व देते. कंपन्या आता अशा तर्कशुद्ध विचार करणाऱ्या उमेदवारांना निवडून, त्यांना गरजेचे ट्रेनिंग देतात आणि लाखो रुपये खर्च करून ते त्यांच्या संस्थेचे "ऍसेट्स" बनवतात.

सध्याची गुंतवणुकीची स्थिती अलीकडच्या काळात शेअर मार्केटमध्ये आलेल्या घसरणीमुळे अनेक गुंतवणूकदार स्टार्टअपमध्ये पैसे गुंतवताना खूप विचार करून निर्णय घेत आहेत. त्यामुळे नवीन स्टार्टअप्ससाठी फंडींग मिळवणे पुर्वीपेक्षा जास्त स्पर्धात्मक होत चालले आहे.

सरकारची ही धोरणं आणि आयआयटीयन्सची व्यवसाय क्षेत्रातील वाटचाल लक्षात घेतली तर हे स्पष्ट होते की बुद्धिमत्ता, दृढनिश्चय आणि योग्य मार्गदर्शन असेल तर कोणताही स्टार्टअप यशस्वी होऊ शकतो मग तो आयआयटीयन्सचा असो की इतर कोणाचाही.

आपल्याला काय वाटते स्टार्टअप फंडिंग बद्दल? तुमचा अभिप्राय नक्की कळवा!

# आरोग्यसेवेत सुधारणा हवी

वेळेवर रुग्णवाहिका उपलब्ध न झाल्याने के डी एम सी च्या हॉस्पिटल मध्ये उपचारास आलेल्या सविता बिरादार या महिलेचा मृत्यू झाल्याची बातमी वाचनात आलीं.यापूर्वीही अशा घटना वारंवार झालेल्या आहेत.अनेकांस वेळोवेळी सोयी सुविधा मिळत नाहीत आणि अनेकांना हकनाक जीव गमवावा लागतो.आजही आपण ओरडून ओरडून सांगत असलो इंडिया शायनिंग, स्मार्ट इंडिया, आत्मनिर्भर भारत तरीही अत्यंत खेदाने बोलावेसे वाटते की ज्या मूलभूत सोयी सुविधा आहेत त्यापासून अनेकजण वंचितच राहतात.शहरात रुग्णवाहिका मिळत नाहीत तर गावखेड्यात काय भीषण परिस्थिती असेल याचा विचार न केलेलाच बरा.आजही गावखेड्यात वाड्या वस्तीमध्ये रुग्णवाहिका मिळत नाहीत, आरोग्य केंद्र नाहीत, असतील तर डॉक्टर औषधे उपलब्ध नसतात. अनेकदा झोळीतून मृतदेह पाच पाच दहा दहा किमी न्यावा लागतो.या सर्व गोष्टी संतापजनक आणि निंदनीय आहेत पण शासनाला त्याचे काहीच पडलेले नाही. गेल्या महिन्यात पुणे येथील नावाजलेल्या मंगेशकर रूग्णालयात हलगर्जीपणामुळे एका महिलेला जीव गमवावा लागला. अशा घटना वारंवार घडतात, लाखो करोडो रु आरोग्य यंत्रणेवर दरवर्षी खर्च केले जातात तरीही समस्या या जैसे थथे तशाच आहेत.या सर्व जंजाळातून कधी सुटका होईल हा प्रश्न सर्वसामान्य विचारात आहेत.

गणेश हिरवे
जोगेश्वरी पूर्व

## कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी, राज्यातील गुणवंत कामगारांना न्याय द्यावा.सुरेश केसरकर

नवी मुंबई : (सुभाष हांडे देशमुख) राज्य सरकारच्या इतर विभागाच्या पुरस्कार्थींना, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसमधून प्रवासात सवलत दिली जाते. मात्र महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या पुरस्कार प्राप्त पुरस्कार्थींना आजअखेर कोणताही लाभ दिला जात नाही. हि बाब संबंधित पुरस्कार्थींवरती अन्यायकारक आहे. त्यामुळे कामगार मंत्री आकाश फुंडकर व राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी गुणवंत कामगारांना न्याय दिला पाहिजे, अशी आग्रही मागणी राज्य गुणवंत कामगार असोसिएशन, महाराष्ट्रचे अध्यक्ष सुरेश केसरकर यांनी राज्य सरकारकडे लेखी पत्राद्वारे केली आहे. राज्य शासनाच्या कामगार विभागामार्फत सामाजिक, शैक्षणिक, साहित्यिक, सांस्कृतिक, कला - क्रीडा, संघटना तसेच समाजातील वंचित व उपेक्षित घटकांसाठी भरीव कामगिरी करणाऱ्या नोंदीत कामगारांना "विश्वकर्मा गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार" देऊन गौरविण्यात येते. हा कार्यक्रम राज्याचे महामहीम राज्यपाल, मा. मुख्यमंत्री, मा. उपमुख्यमंत्री, मा. कामगार मंत्री, मा. कामगार राज्यमंत्री, मा. केंद्रीय मंत्री, मा. आमदार, मा. खासदार, संचालक मंडळ तसेच प्रमुख प्रशासकिय आदी मान्यवरांच्या शुभ हस्ते संपन्न होतो. हा भव्य दिव्य शानदार सोहळा म्हणजे, संबंधित कामगारांच्या आयुष्यातील अविस्मरणीय क्षण असतो. राज्य सरकारच्या इतर विभागाच्या वतीने थोडक्यात- अण्णाभाऊ साठे पुरस्कार, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर दलित मित्र पुरस्कार, महात्मा गांधी व्यसन मुक्ती पुरस्कार आदींना महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसमधून प्रवासात सवलत दिली जाते. मात्र महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या पुरस्कार प्राप्त पुरस्कार्थींना आजअखेर कोणताही लाभ दिला जात नाही. विश्वकर्मा गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार प्राप्त पुरस्कार्थींना सदरचा लाभ मिळावा यासाठी, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्यावतीने योजना स्वरूपात सदरचा प्रस्ताव कल्याण आयुक्तांच्या माध्यमातून प्रधान सचिव कामगार यांना सादर करण्यात आला होता. त्यानंतर अंतिम मंजुरीसाठी तो प्रस्ताव मा. कामगार मंत्री यांचे कडे पाठवण्यात आला आहे. ज्यायोगे राज्य सरकारवरती कोणत्याही स्वरूपाचा आर्थिक बोजा पडत नाही. विशेष म्हणजे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील ११ फेब्रुवारीच्या मंत्रालयीन भेटीत याबाबतीत लवकरच सकारात्मक निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन देखील दिले आहे. त्यामुळे कामगार मंत्री आकाश फुंडकर व राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी राज्यातील गुणवंत कामगारांना राज्य परिवहन महामंडळाच्या माध्यमातून प्रवास सवलतीचा लाभ देवून कष्टकरी कामगार कार्यकर्त्यास प्रोत्साहन व पाठबळ द्यावे, असे मत सुरेश केसरकर यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना व्यक्त केले.

## जिल्हाधिका-यांचा बिनकामाचा जनता दरबार ; पवनचक्की कंपन्यांच्या मनमानी कारभार विरोधात दाद मागणा-या पाटोदा तालुक्यातील पाचेगाव येथील शेतकऱ्यांचा अपेक्षाभंग :- डॉ.गणेश ढवळे

बीड:- ( दि.०९ ) पाटोदा तालुक्यातील पाचेगाव येथील पवनचक्की कंपन्यांच्या मनमानी कारभारामुळे वैतागलेले शेतकरी पवनचक्की कंपन्यांकडून होणारी आर्थिक पिळवणूक आणि पोलिस प्रशासनाची दडपशाही या विरोधात न्याय मागण्यासाठी दि.८ गुरूवार रोजी जिह्लाधिकारी यांच्या कार्यालयातील जनता दरबारात न्यायाच्या प्रतिक्षेत असताना जिल्ह्याच्या सर्वोच्च पदावर बसलेल्या जिह्लाधिकारी यांनी त्यांना न्याय देण्यास असमर्थता दर्शवली व पाटोदा उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांच्याकडे दाद मागा मी यात काहीही हस्तक्षेप करू शकत नाही अशी हतबलता दर्शविल्याने अखेर शेतकऱ्यांनी आपली नाराजी दर्शवली व हा तर जिह्लाधिका-यांचा बिनकामाचा जनता दरबार अशी संतप्त प्रतिक्रिया दिली आहे. सविस्तर माहितीस्तव जिह्लाधिकारी बीड यांनी आठवड्यातून ३ दिवस सोमवार, मंगळवार आणि गुरुवार सकाळी ११ ते २ या वेळेत जनता दरबार घेऊन सर्वसामान्य नागरिकांच्या तक्रारी ऐकल्या जातील व त्यांच्या तक्रारींचा निपटारा करण्यात येईल असा बीडकरांना विश्वास दिला.याविषयी भरपूर दैनिकातुन प्रसिद्धीही झाली. त्यामुळे वारंवार तक्रारी करूनही समस्या न सुटलेल्या नागरीकांना जिह्लाधिकारी यांना प्रत्यक्ष भेटून आपले गा-हाणे मांडुन आपले प्रश्न सुटणार अशा आशा पल्लवित झाल्या होत्या मात्र त्या फोल ठरल्याची प्रतिक्रिया पाटोदा तालुक्यातील पाचेगाव येथील शेतकऱ्यांनी दिली आहे.

जनता दरबारात नागरीकांच्या तक्रारी अनुषंगाने संबंधित विषयांच्या अधिकाऱ्यांना (फोनवर )बोलुन विषय मार्गी लावण्याचे आदेश दिले जातील आणि जिल्ह्यधिकारी यांनी आदेश दिल्याने आपल्या समस्या मार्गी लागतील अशी भावना असते.त्यामुळे तक्रारदार नागरीकांचे निदान समाधान तरी होते. दि.०७ मे बुधवार रोजी सकाळी पाटोदा तालुक्यातील पाचेगाव येथील




शेतकऱ्यांना मावेजा न देताच शेतातुन विद्युत तारा ओढण्याचे काम पोलिस बंदोबस्तात जबरदस्तीने होत होते.याला शेतकऱ्यांनी विरोध केला त्यामुळे त्याठिकाणी काही काळ कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला होता. सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे हे सुद्धा शेतकऱ्यांच्या विनंती वरून घटनास्थळी पोहोचले. त्यांना शेतकऱ्यांनी पवनचक्की कंपन्यांनी आर्थिक फसवणूक केली असुन मावेजा न देणे,कमी जास्त मावेजा देणे, न वटणारे धनादेश देणे व मावेजा मागितल्यावर पोलिस प्रशासनाच्या मदतीने दडपशाही असे प्रकार सुरू असल्याचे सांगितले.याविषयी उपस्थित पोलिस उपनिरीक्षक आदिनाथ भडके पाटोदा पोलिस स्टेशन यांच्याशी डॉ.गणेश ढवळे यांनी व शेतकऱ्यांनी संवाद साधला असता. सशुल्क पोलिस संरक्षण मागितल्याने आमची कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये हि आमची जबाबदारी असुन मावेजा मिळणे,काम थांबविणे आमच्या हातात नसुन तुम्ही जिह्लाधिकारी यांच्याकडून काम थांबविण्याचे आदेश आणा असे सांगितले. त्यानंतर पाचेगाव येथील १० शेतकरी यांनी दुपारी भाड्याने गाडी करून पवनचक्की कंपन्यांच्या मनमानी कारभार विरोधात जिह्लाधिकारी यांना लेखी तक्रार दिली.त्यांना दुसऱ्या दिवशी जनता दरबारात बोलावले.काल दि.०८ गुरुवार रोजी आठवडी बाजार असतानाही शेतकरी पुन्हा भाड्याने गाडी करून जिह्लाधिकारी यांना भेटून मावेजा न देताच तारा ओढत असुन ते काम मावेजा मिळेपर्यंत थांबवावे अशी विनंती केली. जिह्लाधिकारी यांनी पवनचक्की कंपन्यांनी सशुल्क संरक्षण मागितले असल्याने मला काम थांबवता येत नाही असे म्हणत तुम्ही पाटोदा तालुक्यातील उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांना भेटून ते ठरवतील तो मावेजा घ्या.मला यात काहीही करता येत नाही असे सांगितले आणि पाटोदा येथील उपविभागीय अधिकारी अथवा तहसीलदार यांच्याशी फोनवरून सुचना न देताच आल्या पावली घरी पाठवले. त्यामुळे आता पिडीत शेतकऱ्यांना असा प्रश्न पडला की जिह्लाधिकारी यांच्या हातात काही नाही तर मग आम्हाला गाडी भाडे करून दुसऱ्या दिवशी जिह्लाधिकारी कार्यालयात का बोलावले????? त्यामुळे पाचेगाव शेतकऱ्यांनी जिह्लाधिकाऱ्यांच्या जनता दरबाराला बिनकामाचा दरबार भरत असल्याची संतप्त प्रतिक्रिया डॉ.गणेश ढवळे यांच्याशी बोलताना दिली.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
शनिवार १० मे २०२५
https://lokaarambh.com


# पाकिस्तानचा पुन्हा ड्रोन हल्ला, भारताच्या ५ राज्यातील २० शहरांवर थेट टार्गेट

भारत पाकिस्तानातील तणाव हा दिवसेंदिवस वाढत चालला आहे. पहलगाम हल्ल्याला भारताने ऑपरेशन सिंदूरद्वारे दिलेल्या चोख प्रत्युत्तरानंतर पाकिस्तान बिथरला आहे. सध्या पाकिस्तानकडून सातत्याने शस्त्रसंधीचे उल्लंघन केले जात आहे. पाकिस्तानच्या कुरापती सातत्याने सुरु आहेत. पाकिस्तानकडून आज पुन्हा एकदा अनेक ठिकाणी ड्रोनने हल्ला करण्याचा डाव भारताने उधळून लावला आहे. पाकिस्तानने आज पाच राज्यांना टार्गेट करण्यात आले. यात जम्मू, काश्मीर, राजस्थान, पंजाब आणि गुजरातचा समावेश आहे. यात नागरी वस्त्या, धार्मिक स्थळे आणि विमानतळांवर हल्ला करण्यात आला. यावेळी भारताच्या पाच राज्यांमधील २० शहरांना टार्गेट करण्याचा प्रयत्न पाकिस्तानकडून झाला. तसेच सध्या पाकिस्तानकडून सीमा भागात सातत्याने गोळीबार सुरु आहे. पाकिस्तानने काश्मीरमध्ये अनेक ठिकाणी ड्रोन हल्ले करण्याचा प्रयत्न सुरु आहे. यात श्रीनगर विमानतळ, बडगाम, गांदरबल, अवंतीपोरा यांसारख्या काश्मीर खोऱ्यातील वेगवेगळ्या भागांना लक्ष्य करण्याचा प्रयत्न केला जात आहे. मात्र भारतीय सुरक्षा दलांनी या सर्व प्रयत्नांना



हाणून पाडले. चार राज्यांमधील २० शहरांना पाकिस्तानकडून टार्गेट जम्मू सांबा उरी पुंछ पठाणकोट बारामुल्ला कुपवाडा राजौरी अवंतीपुरा नौशेरा अखनूर तंगधार जैसलमेर उत्तरलाई फलौदी अमृतसह फिरोजपूर बाढमेर भारतीय सेनेकडून सर्व ड्रोन नष्ट पाकिस्तानकडून काश्मीरमधील श्रीनगर विमानतळ, बडगाम, गांदरबल, अवंतीपोरा यासह काश्मीर खोऱ्यातील विविध भागांना लक्ष्य करण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र भारतीय सेनेकडून हे सर्व ड्रोन नष्ट करण्यात आले. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, सध्या परिस्थिती नियंत्रणात असून नागरिकांनी घाबरण्याची गरज नाही. तर दुसरीकडे भारत पाकिस्तान तणावाच्या पार्श्वभूमीवर सध्या दिल्लीत अनेक विशेष बैठका सुरु आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार (एनएसए) अजित डोभाल यांच्यातील बैठक नुकतीच संपली आहे. डोभाल यांच्यासोबत परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर हे देखील पंतप्रधान निवासस्थानातून बाहेर पडले. ही बैठक सुमारे दीड तास चालली. तर दुसरीकडे श्रीनगर विमानतळाच्या आसपास स्थानिक नागरिकांनी स्फोटांचे आवाज आल्याची माहिती समोर येत आहे. पण हा ड्रोन हल्ला होता. जो भारतीय सैन्याकडून यशस्वीरित्या उधळण्यात आला आहे. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दक्षिण काश्मीरमधील अवंतीपोरा येथे सुरक्षा दलांनी एका ड्रोन नष्ट केला आहे. सध्या काश्मीर खोऱ्यात पूर्णपणे ब्लॅकआऊट आहे.

## आश्वी खुर्दच्या कर्मवीर भाऊराव पा.विद्यानिकेतन मधे कर्मचा-यांचा सेवापूर्ती कृतज्ञता सोहळा संपन्न

गणेश हिरवे मुंबई प्रतिनिधी आश्वी खुर्द ता संगमनेर येथील लोकनेते डॉ.बाळासाहेब विखे पा ( पद्मभूषन उपाधिने सन्मानीत ) प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील विद्यानिकेतन व कनिष्ठ महाविद्यालयात उपमुख्यध्यापीका सौ. अलका तांबे मॅडम , राज्यस्तरीय आदर्श ग्रंथपाल पुरस्कार प्राप्त श्री. उल्हास देव्हारे सर ,कनिष्ठ महाविद्यालयाचे उपशिक्षक श्री. राजेंद्र चौधरी सर , माध्यमीकचे उपशिक्षक श्री. अनिलकुमार डांगे सर , विज्ञान परिचर श्री. बाळासाहेब वाबळे यांचा सेवापूर्ती कृतज्ञता सोहळा उत्साहात संपन्न झाला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा समितीचे अध्यक्ष श्री. आण्णासाहेब भोसले पाटील होते. , तर प्रमुख अतीथी संस्थेच्या शिक्षण संचालिका



सौ. लिलावती सरोदे मॅडम व संचालक डॉ. प्रदिप दिघे सर सर उपस्थीत होते, प्रथम अतीथी व सेवानिवृत्त होणा-या सेवकांच्या हस्ते पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पा. व पद्मभूषन डॉ. बाळासाहेब विखे पा. यांच्या प्रतिमेचे पूजन करुन अभिवादन केले, त्यानंतर प्रमुख अतीथीच्या शुभहस्ते सेवानिवृत्त कर्मचा-यांचा सत्कार करुन, सन्मानपत्र देउन गौरविण्यात आले ‘‘नियत वयोमानानुसार कर्मचारी सेवानिवृत्त होत असतातच, त्याच प्रमाणे आश्वी खुर्दच्या या शाळेतील शिक्षक शिक्षकेतर कर्मचा-यांमुळे आजपर्यंत अनेक विद्यार्थी चांगल्या पदावर पोहचले, ग्रंथपाल देव्हारे सरांनी ‘जॉय ऑफ गिव्हिग’ या मुंबई येथील सामाजीक संस्थेचा २०२५ चा , पारस व संवर्धिनी या संस्थांचे ‘‘राज्यस्तरीय आदर्श ग्रंथपाल पुरस्कार’’ मिळवुन संस्थेच्या व शाळेच्या नाव लौकीकात नेहमीच भर टाकली आहे, या पुढील त्यांचे आयुष्य आनंदी ,सुख समृद्धीचे व आरोग्यदायी जाओ हि साईचरणी प्रार्थना करते ‘‘ असे मनोगत शिक्षण संचालिका सौ. सरोदे मॅडम यांनी व्यक्त केले व शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे प्रास्तवीक प्राचार्य श्री. सयराम शेळके सरांनी करून सर्वाचे स्वागत केले , पर्यवेक्षिका सौ.माधुरी सातपुते मॅडम यांनी सेवानिवृत्त कर्मचा-यांच्या कार्याची माहिती दिली. सेवानिवृत्त होणा-या उपमुख्यध्यापीका सौ तांबे मॅडम , चौधरी सर , देव्हारे सर यांनी आपले मनोगत व्यक्त करुन कृतज्ञता व्यक्त केली व सर्वाचे आभार मानले, सेवनिवृत्त कर्मचा-यांनी सी.ई.टी. पुस्तकांचा संच विद्यालयास संप्रेम भेट दिला. या कार्यक्रमास सरपंच सौ.अलका गायकवाड , बापुसाहेब गायकवाड पा , विठ्ठल वर्पे सर,डॉ.दिनकर गायकवाड पा, मनीषा लुनीया ,डॉ. बाळासाहेब आंधळे , संपत कुटे सर, मुस्ताक शेख सर, डॉ. आण्णासाहेब तांबे सर, शंकर गाडेकर आदि ग्रामस्त,शिक्षक -शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थीत होते.सुत्रसंचलन सौ.मोना निचळ मॅम यांनी केले तर आभार सौ.अंजुम शेख मॅडम यांनी मानले.शेवटी विद्यार्थी व उपस्थीत सर्वांनी भोजनाचा स्वाद घेतला.

## तारकेश्वर गडासाठी विकासकामे प्राधान्याने पूर्ण करू – उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आश्वासन

बीड (प्रतिनिधी) श्री क्षेत्र तारकेश्वर गड येथे आयोजित कार्यक्रमात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उपस्थित वारकरी भाविकांशी संवाद साधताना, गडाच्या विकासासाठी आवश्यक असलेली सर्व कामे प्राधान्याने पूर्ण केली जातील, असे ठाम आश्वासन दिले. उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, ‘‘मी वारकरी संप्रदायाचा सेवक आहे. गडासाठी जे कुंपण, सभागृह, रस्ते आणि इतर विकासकामे आवश्यक असतील ती कामे प्राधान्याने सोडवली जातील. मी दिलेला शब्द पाळतो.’’ त्यांनी वारकरी संप्रदायाच्या अध्यात्मिक परंपरेचे कौतुक करत संत-महंतांच्या योगदानाचे स्मरण केले. या कार्यक्रमाला आमदार सुरेश धस, महंत आदिनाथ महाराज, शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप, सचिन मुळक, स्वप्निल बंद, भाजपाचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांच्यासह विविध अधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात संत-महंतांनी उपमुख्यमंत्र्यांचे स्वागत करून त्यांना आशीर्वाद दिले. गडाच्या उन्नतीसाठी शासनकडून सातत्याने मदत केली जाईल, असा विश्वास यावेळी व्यक्त केला.

गडावरील रस्ते, मूलभूत सुविधा आणि वारकऱ्यांसाठी आवश्यक सोयी-सुविधा उभारण्यात येणार असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली. वारकरी भाविकांत उपमुख्यमंत्र्यांच्या या घोषणेमुळे आनंदाचे वातावरण होते.




## अस्मिताच्या सुवर्ण मोहत्सवाला सुरुवात

गणेश हिरवे मुंबई प्रतिनिधी जोगेश्वरी पूर्व येथील अस्मिता सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक संस्थेचे रोपटे दिनांक १ मे १९७६ रोजी जोगेश्वरी पूर्व येथे लावले गेले.हे वर्ष म्हणजेच २०२५-२६ साली संस्था सुवर्ण महोत्सवी वर्ष म्हणून मोठ्या उत्साहात साजरे करणार असून याची सुरुवात दिनांक १ मे २०२५ रोजी प्रमुख पाहुणे वक्ते विवेक अग्रवाल यांच्या शुभहस्ते बौद्धिक म्हणून सार्थ, संपन्न, स्वावलंबी राष्ट्र निर्मितीची कुटुंब जीवन ही आधारशीलता आहे असे सांगून समाज जीवनात, समाज निर्मितीत आणि समाज रचनेते कुटुंब संस्थेचे काम अतिशय महत्वाचे आहे असे सूतोवाच केलं. कार्यक्रमाची सुरुवात द्वीप प्रज्वलन करून संस्थेचे विद्यमान अध्यक्ष शेखर पारखी, सरचिटणीस राजन चाचड, विवेक अग्रवाल, रवी नथानी यांच्या शुभहस्ते करण्यात आली. यावेळी माजी मुख्याध्यापक दिलीप माने आणि जॉय ऑफ गिविंग चे संस्थापक अध्यक्ष गणेश हिरवे यांचा विशेष सन्मान करण्यात आला. समाजासाठी माझे काय योगदान असू शकते तसेच काय काय चांगले काम करता येईल यावर उपस्थितांपैकी अनेकांनी प्रतिक्रिया मांडल्या.संस्थे



तर्फे चालवण्यात येणाऱ्या अस्थिव्यंग्य चिकित्सा व पुनर्वसन केंद्र, कौन्सिलिंग सेन्टर, कौशल्य विकास केंद्र, शिशू विकास केंद्र, प्राथमिक आणि माध्यमिक विद्यालय इत्यादी विभागाच्या वर्षभराच्या कार्याचा आढावा उपस्थिता समोर मांडण्यात आला.संस्थेच्या स्थापने पासून मोलाचे योगदान देणाऱ्या सर्वश्री दादा घैसास, विष्णू गणेश पटवर्धन उर्फ दादा पटवर्धन, डॉ नाथानी, रमेश चिकोर्डे, जगदीश सामंत व नाना बारसोडे या तपस्वी कार्यकर्त्यांचा विशेष उल्लेख करण्यात आला. सुवर्ण वर्षात अस्मिता संस्था समाज उपयोगी विविध उपक्रम नव्याने साजरे करणार आहे.अस्मिता एक नावाजलेली संस्था म्हणून मुंबई महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे.संस्कृतिक क्षेत्रातही संस्थेने मोलाचे कार्य केले आहे. मराठी नाट्यमहोत्सव, विविध सामाजिक विषयावरील व्याख्यान्माला, महाराष्ट्राव्यापी काव्यस्पर्धा व विविध साहित्य विषयक उपक्रम, युवकांसाठी उत्स्फूर्त वक्तृत्व स्पर्धा, रक्तदान शिबीर इ अनेक कार्यक्रम अस्मिता संस्था सातत्याने करीत असते. गेल्या पन्नास वर्षात अस्मिता संस्थेला अनेक पुरस्कार मिळालेले असून अस्मिता संस्थे मधून अनेक दिव्यांग स्वतःच्या पायावर उभे राहिले आहेत, तसेच अस्मिता संचालीत विद्यालयातून शिकलेले अनेक विधार्थी देशात आणि परदेशात विविध मोठ्या पदांवर काम करीत आहेत याचा सर्वांना अभिमान आहे.सुवर्ण महोत्सवाचे सर्वांनीच स्वागत केलं असून शुभेच्छा दिल्या आहेत.

# मोदींच्या नेतृत्वाखालील हा नवा भारत आहे.. पाकिस्तानला जशास तसे उत्तर दिले जाईल -उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## तारकेश्वर गड येथील नारायण महाराज पुण्यतिथी उत्सवाच्या कार्यक्रमात उपस्थिती

बीड दि. 9 ( जिमाका ) : -पाकिस्तानला जशास तसे उत्तर द्यायचं काम भारत करत आहे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली असलेला हा घुसके मारेंगे वाला भारत आहे..

आमच्या लाडक्या बहिणींचे कुंकू पुसण्याचे काम या दहशतवाद्यांनी केलं त्यासाठी ऑपरेशन सिंदूर पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखाली सुरू करण्यात आले त्याचे मी स्वागत करतो.. पाकिस्तानला जशास तसे उत्तर द्यायचं काम आमचे जवान करत आहेत या दरम्यान महाराष्ट्रातील दोन जवान शहीद झाले त्यांना मी आदरांजली वाहतो असे म्हणत, केंद्राच्या मार्गदर्शक सुचने प्रमाणे महाराष्ट्रात सुरक्षा व्यवस्था ठेवण्यासाठी बैठक झाल्याची देखील



एकनाथ शिंदे यांनी सांगितले.. बीडच्या तारकेश्वर गड येथे संत नारायण बाबा यांच्या पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे बोलत होते.. यावेळी व्यासपीठावर आमदार सुरेश धस, जिल्हाप्रमुख अनिल जगताप सचिन मुळूक यांची प्रमुख उपस्थिती होती.. गडाच्या विकासासाठी आवश्यक ती मदत आपण करणार असल्याचा शब्द देखील उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी गडाचे महंत आदिनाथ महाराज यांना दिला..

कार्यक्रमासाठी गडावरील हेलिपॅड वर त्यांचे आगमन झाले त्यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन तसेच पोलीस अधीक्षक नवनीत कांवत यांनी प्रशासनाच्या वतीने त्यांचे स्वागत केले.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com